Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 25 November 2026
Time 7.10 to 7.20 AM
Language Marathi
आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
प्रादेशिक बातम्या
दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- पेपरफुटीच्या प्रकरणांत सात ते दहा वर्षांचा कारावास तसंच १० कोटी रुपये दंडाची शिफारस, भरती आणि स्पर्धा परीक्षा सुधार समितीचा दुसरा अहवाल सादर
- शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची निवड
- व्यायामशाळांमध्ये आरोग्यपूरक पदार्थांची अनधिकृतपणे विक्री, तसंच आरोग्यविषयक खोटे दावे करणाऱ्यांवर कारवाईचा अन्न आणि औषध प्रशासनाचा इशारा

आणि

- आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेत वैभव सूर्यवंशीचा विश्वविक्रम

****

राज्यात भरती आणि स्पर्धा परीक्षांमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीनं आपला दुसरा अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. पेपरफुटीच्या प्रकरणात सात ते दहा वर्षांचा कारावास, किमान १० कोटी रुपयांचा दंड आणि दोषींची मालमत्ता जप्त करण्याची शिफारस या अहवालात करण्यात आली आहे. परीक्षांमधले गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना आणि जलदगती न्यायालय सुरू करण्याची शिफारसही समितीनं केली आहे .एमपीएससीच्या उमेदवारांना परीक्षा शुल्क परत देणं, उत्तरतालिकेवरील योग्य हरकतींसाठी शुल्क परतावा, परीक्षा केंद्रांची स्वतंत्र बँक तयार करणं आणि परीक्षा प्रक्रियेत जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठेवण्याच्याही शिफारशी करण्यात आल्या आहेत. पेपरफुटीविरोधी कायद्यात आणखी सुधारणा करून हा कायदा याच

हिवाळी अधिवेशनात मांडून मंजूर करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना ते म्हणाले,

बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

****

पुणे इथं होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. १९८२ पासून साहित्यिक प्रवासाला सुरुवात करणाऱ्या शरणकुमार लिंबाळे यांनी आजवर ४७ ग्रंथांचं लेखन केलं आहे .'अक्करमाशी', 'राणीमाशी' आणि २०२६ मधील 'दलित फाइल्स' या पुस्तकांसह त्यांच्या साहित्याचं विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत .त्यांच्या साहित्यिक योगदानाची दखल घेत महामंडळाच्या सदस्यांनी त्यांची एकमताने निवड केली.
अक्करमाशी या गाजलेल्या आत्मकथनातून लिंबाळे यांनी जातिव्यवस्थेचं वास्तव आणि वंचितांच्या जगण्यातील संघर्ष मांडला. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र या ग्रंथातून त्यांनी दलित साहित्याची स्वतंत्र वैचारिक मांडणी केली. कादंबरी, कथा, कविता आणि समीक्षा अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांचं लेखन आहे. सनातन या कादंबरीसाठी त्यांना २०२० मध्ये सरस्वती सन्मान मिळाला होता. हे संमेलन २७ ते ३० जानेवारी दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणार आहे.

****

गोव्यात सुरू असलेल्या ५७ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल ज्येष्ठ दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांच्या साधी माणसं या मराठी चित्रपटाची पुनर्संचयित आवृत्ती प्रदर्शित करण्यात आली. अभिनेते सूर्यकांत मांढरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या विशेष प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रीय चित्रपट वारसा अभियानांतर्गत या चित्रपटाचं पुनर्संचयन करण्यात आलं आहे.

****

शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू, गुरू नानक देवजी यांची जयंती काल देशभरात उत्साहात साजरी करण्यात आली. राज्यातल्या विविध गुरुद्वारांमधे प्रकाशपर्वानिमित्त प्रार्थना, शबद कीर्तन, प्रवचन इत्यादी धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांसह लंगरचंही आयोजन करण्यात आलं होतं. छत्रपती संभाजीनगर शहरात रक्तदान शिबिर, सर्वरोग निदान शिबिर यासह विविध धार्मिक आणि सामाजिक

उपक्रमांच्या माध्यमातून गुरुनानक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. उस्मानपुरा गुरुद्वारा ते धावणी मोहल्ला गुरुद्वारापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

****

कार्तिक पौर्णिमा आणि देव दीपावली काल सर्वत्र साजरी करण्यात आली. यानिमित्त बीड तालुक्यातल्या श्रीक्षेत्र कपिलधार इथं भरलेल्या यात्रेत हजारो भाविक सहभागी झाले आहेत. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या यात्रेचा आज समारोप होत आहे.

त्रिपुरारी पौर्णिमा, गुरुनानक जयंती, देव दिवाळी आणि कार्तिक पर्वाच्या समाप्तीनिमित्त बीड शहराचं ग्रामदैवत असलेल्या ऐतिहासिक कनकालेश्वर मंदिरात काल भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला.

जालना जिल्ह्यातल्या अंबड इथल्या श्री मत्स्योदरी देवी मंदिरात काल त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त ११ हजार दिवे प्रज्वलित करून भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

परभणी जिल्ह्यात पोखर्णी इथल्या श्री लक्ष्मी नृसिंह मंदिरात एक लाख दिवे प्रज्वलित करण्यात आले.

****

व्यायामशाळांमध्ये आरोग्यपूरक पदार्थांची अनधिकृतपणे विक्री केल्यास, तसंच पोषणपूरक उत्पादनांच्या वेष्टनावर आरोग्यविषयक खोटे दावे केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा, अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. विक्रीसाठी ठेवलेली उत्पादनं कायदेशीर असावीत, त्यांच्याबाबत कोणतेही खोटे दावे केलेले नसावेत आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे वैध परवाने असावेत, याची खातरजमा करण्याची वैयक्तिक जबाबदारी घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते आणि व्यायामशाळा चालकांची आहे. ही जबाबदारी फक्त उत्पादकांवर ढकलता येणार नाही, असं मुंढे यांनी स्पष्ट केलं.

****

दिवंगत भाजप नेते राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांच्या पार्थिव देहावर काल हिंगोली इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. गेल्या रविवारी वडकुते यांचं हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झालं. अंत्यविधीसाठी विधानसभेचे सभापती राम शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

****

धाराशिव जिल्ह्यात लॉजिस्टिक्स पार्क, संरक्षण क्षेत्रासाठी आवश्यक साहित्य आणि उपकरणं निर्मिती करणारे उद्योग तसंच विविध रोजगाराभिमुख उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून, स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणार असल्याचं आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिलं. धाराशिव इथं खासदार नोकरी महोत्सव २०२६ मध्ये ते काल बोलत होते. या महोत्सवात ५० पेक्षा अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला होता.

****

धाराशिव जिल्ह्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनाच्या संरक्षणासाठी गावपातळीवर सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत. पशुसंवर्धन विभागाच्या बैठकीत ते काल बोलत होते. चारा छावण्या आणि चारा डेपोचं नियोजन, वैरण विकास कार्यक्रम, पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता तसंच संभाव्य साथरोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

**

दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी सांडपाणी पुनर्वापराचा पर्याय अंमलात आणला जाणार आहे. शहरात दररोज निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा उपयोग वृक्षसंवर्धन, उद्यान विकास, शेती आणि बांधकामांसाठी करण्याचं नियोजन करण्यात आलं आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात येत असून, यासाठी कमी जागेत आणि तुलनेने कमी खर्चात उभारता येणाऱ्या 'मॉड्युलर सिव्हेज ट्रीटमेंट प्लांट' या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.

****

राज्यातल्या तीन हजार ८३२ अंगणवाड्यांचं स्मार्ट अंगणवाड्यांमध्ये रूपांतर करण्यास महिला आणि बालविकास विभागाने मान्यता दिली असून, यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या ९१ केंद्रांचा समावेश केला आहे. स्मार्ट अंगणवाडी किट प्राप्त झाल्यानंतर त्यांचं संबंधित केंद्रांना वाटप करण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने कामं केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या महिला आणि बालकल्याण विभागाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ यांनी सांगितलं.

****

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आज छत्रपती संभाजीनगर शहराच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते संघ कार्यकर्त्यांची बैठक घेणार असून, मंथन सभागृहात पद्म महोत्सवाचं उद्घाटन तसंच सायंकाळी रुक्मिणी सभागृहात डॉ. तसनीम पटेल लिखित टॉर्चर्ड ट्रुथ या पुस्तकाचं प्रकाशन भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

****

भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीनं क्रिकेटच्या मैदानावर ऐतिहासिक कामगिरी करत नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे .दोहा इथं झालेल्या आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेत संयुक्त अरब अमिरातीविरुद्ध त्यानं अवघ्या २८ चेंडूंत शतक आणि ५२ चेंडूंत द्विशतक पूर्ण केलं .५३ चेंडूंत २०४ धावांची तुफानी खेळी करत त्यानं भारत अ संघाला सात गडी राखून दणदणीत विजय मिळवून दिला .या खेळीत त्यानं २८ षटकार आणि सात चौकार लगावले .या शानदार कामगिरीसाठी त्याला सामनावीर पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

****